**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत विहित मुदतीत प्रशासकीय खर्चाकरिता स्वतंत्र बँक खाते उघडण्याबाबत सुचना**

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
मंत्रालय , मुंबई ४०० ०३२
शासन परिपत्रक क्रमांक :- मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.१२/रोहयो-१४
दिनांक - ०२/०६/२०१२

संदर्भ :- शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.१२/रोहयो-१४ दिनांक- ३१/०५/२०१२.

**परिपत्रक**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनंतंर्गत सन २०१२-१३ पासून प्रशासकीय खर्चाकरिता प्रत्येक स्तरावर एक स्वतंत्र बँक खाते उघडण्याबाबतच्या सुचना दि.३१/०५/२०१२ च्या शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.१२/रोहयो-१४ अन्वये (इंग्रजीमधून) ई-मेलद्वारे देण्यात आलेल्या आहेतच. तसेच सदर शासन निर्णय वेबसाईटवरही अपलोड करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे सर्वस्तरावर स्वतंत्र बँक खाते सुरू (OPEN) करावयाचे असून त्यासंदर्भात पुढील वेळापत्राकाचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

१) दि. १५ जुन ,२०१२ पर्यन्त जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी , मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद , तालुकास्तरावर सर्व तहसिलदार व गटविकास अधिकारी (BDO) यांनी प्रशासकीय खर्चाकरिता स्वतंत्र खाते उघडण्याबाबतची कार्यवाही पुर्ण करावयाची आहे.

२) वरीलप्रमाणे उघडण्यात आलेल्या सर्व बँक खात्यांचा तपशील जसे खाते क्रमांक, बँकेचे नाव व शाखा इत्यादी बाबतची माहिती जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकरी यांनी आयुक्त, मग्रारोहयो नागपूर यांना दि.२० जून,२०१२ पुर्वी सादर करावयाची आहे.

३) मुद्दा क्र. १ व २ नुसार जिल्हयांकडून सर्व कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर आयुक्त , मग्रारोहयो नागपुर यांचेकडून प्रशासकीय खर्चाबाबतचा आवश्यक तो निधी दि.१.०७.२०१२ पासून संबंधित खात्यात वर्ग केला जाईल.

उपरोक्त वेळापत्रकानुसार सर्वस्तरावर बँक खाते उघडण्याची कार्यवाही पुर्ण होणे आवश्यक असून तहसिल स्तरावरील खात्यांबाबत ही जबाबदारी सर्वस्वी जिल्हाधिकारी यांची राहील. तर ब्लॉक स्तरावरील खात्याबाबतची जबाबदारी ही मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांची राहील वरीलप्रमाणे सर्वस्तरावर जर विहित मुदतीत बँक खाती उघडण्यात आली नाहीत तर जिल्हयांना दि.१.०७.२०१२ पासुन वरीलप्रमाणे निधी प्राप्त होणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी. प्रशासकीय खर्चाकरिता सुरू करावयाची सर्वस्तरावरील खाती ही विहित मुदतीत उघडली जातील याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयातील सहाय्यक लेखा अधिकारी (A.A.O) व जिल्हापरिषद (NREGA) मधील सहाय्यक लेखा अधिकारी (A.A.O) यांनी समन्वयन

(Co-Ordination) करावयाचे आहे. तसेच बँक खाते उघडण्याबाबतच्या कामासंदर्भातील प्रगतीबाबतची सर्व माहिती त्यांनी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हापरिषद यांना वेळोवेळी सादर करावी व सर्व कार्यवाही विहित मुदतीत पुर्ण होईल याची दक्षता घ्यावी.तसेच विभागीय आयुक्त कार्यालयाने त्यांचे बँक खाते उघडून त्याची माहिती परस्पर आयुक्त, मग्रारोहयो नागपुर यांना कळवावी.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला आहे. त्याचा संगणक सांकेतांक २०११०८१५१५००५१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(व्हि. गिरीराज)
प्रधान सचिव (रोहयो)

प्रति ,

मा. राज्यपालांचे सचिव
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधानसचिव
मा.मंत्री (मग्रारोहयो) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (मग्रारोहयो) यांचे स्वीय सहाय्यक
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव , मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक
अतिरिक्त मुख्य सचिव
शासनाचे सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
महालेखापाल , महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपुर
महालेखापाल , महाराष्ट्र राज्य (लेखापरिक्षा), मुंबई / नागपुर
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद
महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपुर
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २ , मुंबई / नागपुर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व कार्यासन अधिकारी , रोहयो प्रभाग , निवडनस्ती